# खेळूया आनंदे




## हिरकणी प्रकल्प

## आईने मुलासोबत खेळावयाचे खेळ

ज्ञान प्रबोधिनी, स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

# अनुताई म्हणतात...




"जर मुलाचा सर्वांगीण विकास हवा असेल, तर आधी त्याच्या मातेचे प्रबोधन होणे गरजेचे आहे.

आई ही मुलाची पहिली आणि सर्वश्रेष्ठ शिक्षिका आहे. मूल शाळेत जे शिकते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने ते घरात आपल्या आईचे अनुकरण करून शिकत असते. आईची भाषा, तिची वागणूक, स्वच्छता आणि तिचे संस्कार हे मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचे पहिले घटक असतात.

घरातील अनौपचारिक शिक्षण आईने घरात हसत-खेळत घ्यावे जसे, भाजी निवडताना मुलांना रंगांची ओळख करून देणे, धान्य निवडताना दाणे मोजायला सांगून अंकगणित शिकवणे, रात्री झोपताना गोष्टी सांगून मुलाची कल्पनाशक्ती वाढवणे.

अशा प्रकारे घर हीच एक शाळा कशी बनू शकते. बालशिक्षण ही केवळ शाळा, पाटी आणि पेन्सिल इतकी मर्यादित प्रक्रिया नाही. "

**- ज्येष्ठ समाजसेविका आणि शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ.**

( ग्रामीण आणि आदिवासी भागात काम करताना मांडलेले महत्त्वाचे सूत्र)

# खेळूया आनंदे

## आईने मुलासोबत खेळावयाचे खेळ




ज्ञान प्रबोधिनी
स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

अर्थसाहाय्य : DATWYLER
Datwyler Pharma Packaging India Pvt. Ltd.

# खेळूया आनंदे
(आईने मुलासोबत खेळावयाचे खेळ)

❖ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
कार्यवाह
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०
mahendra.sethiya@jnanaprabodhini.org
© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

❖ **संकल्पना, संपादन**
तृप्ती कुलकर्णी
trupti.kulkarni@jnanaprabodhini.org

❖ **संपादन साहाय्य**
माधुरी कुलकर्णी

❖ **मुखपृष्ठ**
राहुल धामणे

❖ **सजावट, मांडणी व अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

❖ **प्रथम आवृत्ती**
चैत्र प्रतिपदा, गुढीपाडवा शके १९४८/मार्च २०२६

❖ **ISBN :** 978-93-49735-77-4

❖ **किंमत** : ₹ ८०/-

❖ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे–३०
☎ (020) 24207 175/108
**ऑनलाइन खरेदीसाठी** : www.jpprakashane.org

# प्रस्तावना

## हिरकणी...

रायगडावरून आपल्या तान्हुल्यासाठी अंधारी रात्र, अवघड डोंगरकडा, जंगली श्वापदं या कशाचीही पर्वा न करता कड्यावरून उडी मारून गड उतरणारी शिवरायांच्या मावळ खोऱ्यातील एक गवळण म्हणजे हिरकणी! आपणा सर्वांनाच तिची गोष्ट माहीत आहे. तिचा अभिमानही आहे; म्हणूनच ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागाच्यावतीने गावोगावच्या मातांच्या प्रशिक्षणाच्या उपक्रमाचे नाव ठेवले हिरकणी! बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी सतत झटणाऱ्या मातांच्या प्रशिक्षण प्रकल्प उपक्रमाचा हेतू!

३ ते ६ वयोगट हा मेंदू विकास, बुध्दी विकासाचा महत्त्वाचा टप्पा आहे असे शास्त्र सांगते. या वयात बाळाच्या कायम बरोबर असायला हवी अशी व्यक्ती म्हणजे त्याची आई. आपल्या ग्रामीण भागात अशी स्थिती असते की, जेमतेम १८ वर्षे पूर्ण झाली की, मुलीचे लग्न केले जाते. त्यामुळे संसाराची जबाबदारी शिकता-शिकता कधी तिच्याकडे मातृत्वाची जबाबदारी येते हे तिला कळतसुद्धा नाही. त्यामुळे बहुतेकदा सासरच्या घरातील आजी त्या बाळाची काळजी घेत असते. बाळाच्या आईला आपल्या बाळासाठी आपण काय-काय करू शकतो हे शिकावे लागते. अनुभवातून, खेळातून मुलांचे विश्व समृद्ध करण्याची कला आईला शिकावी लागेल. स्वयंपाकघरातील कामे करत असतानाही एकीकडे मुलांच्या स्नायूंचा, ज्ञानेंद्रियांचा विकास करता येतो, याचे तंत्र व मंत्र या हिरकणींना या निमित्ताने शिकता येते.

आपल्याच बाळाची वाढ आपल्यासाठी आनंदाची ठरायला हवी. आपले बाळ मोठे होण्यातला आनंद प्रत्येक आईने घ्यायला हवा. त्यासाठी निरनिराळे खेळ, हस्तकौशल्य, संवादाबरोबरच इतर कौशल्य, प्रत्यक्ष अनुभव इत्यादींची तयारी 'आई' म्हणून कशी करायची याचा एक प्रयत्न आहे. मुलांना त्यांच्या बालपणातच काही शिकवू शकतो जे त्यांना संपूर्ण आयुष्यभर उपयोगी पडेल, असा हा प्रयत्न आहे.

स्वयंपाक घरातील छोटी छोटी कामे करताना आईने बाळाचा सहभाग घेतला तर त्याचा उपयोग बाळाच्या स्नायूंच्या विकासासाठीच होतो व अनुभवविश्व संपन्न होण्यासाठी होतो. कामातला आनंद त्यांना मिळू शकतो. बाळाशी संवाद साधून गोष्टी, गाणी, बडबड गीते गाऊन, त्यांच्या भाषिक विकासास चालना देता येते. त्यामुळे मुले व्यक्त व्हायला शिकतात खेळाच्या माध्यमातून गणिती संकल्पनांचा सराव करता येतो. मुलांना फिरायला घेऊन जाणे, निसर्गाची विविध रूपे, झाडांचे, ढगांचे विविध रंग, विविध फुलांचे विविध सुवास व त्यातील वेगळेपण यासर्वांकडे बाळाचे लक्ष वेधू शकतो. अशा कितीतरी गोष्टी आईच मुलांसाठी करू शकते. आजची मुले ही उद्याची सुजाण नागरिक होणार आहेत. कुटुंबसंस्था, बदलती जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये आई व मुलाचे नाते न बदलणारे आहे. म्हणूनच बाळाच्या वाढीसाठी आईने आपला अमूल्य वेळ, आनंद, प्रसन्नता, बौद्धिकक्षमता, संवेदनक्षमता ओतून बाळाला समाजाभिमुख करावे. आईच्या पोटात असल्यापासून बालकाने शाळेत प्रवेश घेईपर्यंतचा अतिशय महत्त्वाचा काळ असतो. हा काळ म्हणजे आयुष्यभरासाठीची पायाभरणी असते. आईने केलेल्या प्रयत्नाचे मूल्य अनमोल असते आणि प्रत्येक आईसाठी आपले मूल हेच सर्वस्व असते.

ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरात आता मुलांच्या वाढ व विकास याबद्दल बरीच जागृती आहे. पालकत्वाच्या मार्गदर्शनासाठी शुल्क भरून नोंदणी करणारे आई–बाबा आहेत. अशांसाठी कार्यशाळा घेतल्या जातात. परंतु ग्रामीण भागातील मातांना मात्र याबद्दल फारसे माहिती नाही. आमच्या कामात आम्हाला असे लक्षात आले की, आपण वाढवले नाही तरीही बाळ वाढतेच आहे हे ग्रामीण आईला वाटत असते. त्यामुळे घर, शेती व इतर कामाच्या जबाबदाऱ्या असल्यामुळे मूल मोठ्या भावंडांकडे किंवा घरातील वृद्ध लोकांकडे सोपवून माता राबत असतात. अशावेळी आपल्या बाळाच्या आयुष्यातले आपले स्थान व कर्तव्य, त्यांच्या वाढीतील आनंद घ्यायचा आहे याची जाणीव मातांना करून देण्यासाठी हा खटाटोप. त्यासाठीच आमचा हा हिरकणी घडणीचा छोटासा सामुदायिक प्रयत्न.

धन्यवाद!

# पुस्तिके विषयी थोडेसे...

ज्ञान प्रबोधिनी, पुणे संस्थेच्या स्त्री शक्ती विभागाने ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या माता पालिकांसाठी प्रशिक्षण घेतले त्यातून ही पुस्तिका तयार केली आहे. यात आईने मुलासोबत खेळायचे खेळ आहेत.

या पुस्तिकेतील खेळ तयार करताना ग्रामीण परिसरातील महिलांचा म्हणजेच त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी, घरातील वातावरण, परिसरातील साहित्याची उपलब्धता अशा गोष्टींचा विचार केला आहे.

यातील खेळ घेताना घरी/जवळपास मिळणारे साहित्य वापरणे अपेक्षित आहे. त्यासाठी ठराविक साहित्य वापरावे असा फार आग्रह नाही.

मुलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आई सहज घेऊ शकेल अशा खेळांची माहिती या पुस्तिकेत आहे.

ज्या मातांची मुले ३ ते ६ वर्षे वयोगटातील आहेत अशा गावातील १० ते १५ मातांनी हा अभ्यासक्रम एकत्र करावा. गावातच महिन्यातून दोनदा गटाने एकत्र येऊन काही अनुभवांची देवाण-घेवाण करावी, अशी या उपक्रमाची कल्पना आहे.

२०१४ साली सुरू झालेला हिरकणी हा उपक्रम १००पेक्षा जास्त गावांत पोहोचला ज्यामध्ये २५०० माता त्यात सहभागी झाल्या. अशा ग्रामीण मातांच्या अनुभवातून ही समृद्ध झालेली पुस्तिका आहे.

या पुस्तिकेमध्ये 'मुलाचे निरीक्षण' हा शब्द मुलगा आणि मुलगी दोघांच्या संदर्भात वापरला आहे.

# अंतरंग

## खेळ सूची


१. मनोरा लावणे ........ ९
२. जोड्या लावा ........ ११
३. गोष्ट सांगणे ........ १३
४. स्ट्रॉने वाटाणे उचलणे ........ १५
५. कागदी वस्तू ........ १७
६. चित्रातील फरक ओळखा ........ १९
७. आकार जुळवणे ........ २१
८. बडीशेप गोळ्यांचे वर्गीकरण ........ २३
९. दोऱ्याचे रंगकाम ........ २५
१०. स्पर्शावरून खेळ ........ २७
११. रांगोळी काढणे ........ २९
१२. हात मागे बांधून चुरमुरे खाणे ........ ३१
१३. रंगांच्या साहाय्याने चित्रकृती ........ ३३
१४. एकाच आकारावरून चित्र काढणे ........ ३५
१५. पिठातील गोळी शोधणे ........ ३७
१६. पानांची क्रमवारीता ........ ३९

**✻ आकारावरून चित्र काढणे ........ ४३**
**✻ जोड्या लावा ........ ४४**
**✻ चित्रातील ५ फरक ओळखा ........ ४५**
**✻ आकार जुळवणे ........ ४६**
**✻ सांभाळून ठेवावे असे ........ ४७**


हिरकणी प्रकल्प
आईच्या संवादातून पाल्याचा भाषा विकास
मुलांच्या आरोग्याबाबत जाणीव व जागृती
बालकांच्या विविध क्षमता विकसनासाठी अनुभवाची जोड
कल्पना-शक्तीला कृतीतून वाव
निरीक्षणातून बौध्दिक विकासाला चालना

# अनुभवांचे बोल...



ऋग्वेदला पुस्तकवाचन करण्यापेक्षा चित्र काढायला आवडतात. हे माझ्या लक्षात आलं. म्हणून त्याला कोरे कागद आणि रंगीत खडू मी नेहमी देते.

– कीर्तीताई (रांजे)



वेदूला माझ्यासोबत रांगोळी काढायला आवडते. रांगोळी कशीही आली, तरी मी तिचे कौतुक करते.

– प्रियांकाताई (वेल्हे)



बाजारातून भाजी आणली की भार्गवी घेवडा, मटार वेगळे करण्यात बराच वेळ रमते.

– कीर्तीताई (अंबवणे)



प्रज्वलची खेळाची आवड बघून त्याला कुस्ती शिकण्यास प्रोत्साहन दिलं.

– शामल (अस्कवडी)

ज्ञान प्रबोधिनी, स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
संपर्क : ०२०२४२०७१६२